
# शक्तिकवने

## आध्यात्मिक अभंग



कुमारी शक्तिलीला
(निकिता राजेश पाटील)

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# शक्तिकवने

## रचयिता : निकिता राजेश पाटील

# या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

# शक्तिकवने

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो, मजा येते.

पण

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हाला आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना दाद द्या

ई साहित्य ला आपल्या मित्रांचे मेल पत्ते द्या

मित्रांना आमच्याबद्दल मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# शक्तिकवने

निकिता राजेश पाटील

पत्ता : १०९, वांगणी हाईटस्, बदलापूर नेरळ हायवे, पूनम हॉटेलजवळ, वास्तुकार नगर, वांगणी (पूर्व), जि. ठाणे. 421503

फो. न. : ८६८९९५४८०६

e-mail shaktileelanikita@gmail.com

**या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.**

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :
www. esahity.com
www. esahity.in
esahity@gmail.com
eternity, G1102,
eleventh floor,
eastern express highway,
Thane. 400604

प्रकाशन : १९ जुलै २०२१ (आषाढी एकादशी १९४३)

©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# शक्तिकवने

## आध्यात्मिक अभंग

-निकिता राजेश पाटील



## ओळख

निकिता राजेश पाटील.

'कुमारी शक्तिलीला" या नावाने कविता लेख कथांचे लेखन. कथालेखन,काव्यवाचन अशा स्पर्धांत सक्रिय सहभाग.

वाङमयीन परिचय:-१) संस्कृत चंद्रिका अशा मासिकात श्लोक लेखन.

२)विद्याविकास संस्थेच्या वार्षिकात( सांवत्सरिकात) रौप्य महोत्सवानिमित्त 'द्रौपदीचे आत्मकथन" हा ललित लेख व "मनाचे प्रदूषण" ही कविता व "बायको नावाचं अजब रसायन" ही विनोदी कथा प्रकाशित.

३) टिळकनगर सांस्कृतिक महोत्सवानिमित्त “द्रौपदीचे स्वगत”  ह्या एकपात्री प्रयोगाचे वेशभूषा-प्रयोगलेखन-फार्सलेखन व सादरीकरणाचा एकत्रित मेळ.

४) बदलापूरच्या कविसंमेलनात कविरुपात काव्यवाचन.

५) अस्मिता या हस्तलिखित सांवत्सरिकात “नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर’  या लेखाचे लेखन.

६)मानवविद्या विभागात ‘वाचनसंस्कृती : डिजिटल आणि इलेक्ट्रॉनिक ग्रंथालयाचे महत्त्व”  या विषयावर संशोधन.

७) निबंध , वक्तृत्व स्पर्धांमध्ये प्रथम क्रमांक.

वाचन:- मी आजपर्यंत विविध प्रकारची पुस्तके वाचली आहेत.त्यातील सगळ्यात जास्त महाभारताची पुस्तकं आहेत.

👸 👰 👸

# अर्पणपत्रिका

मला ध्यानयोगात प्रविष्ट होण्यासाठी

प्रेरणा देणाऱ्या, मला आध्यात्मिक ज्ञान

देणाऱ्या ,माझ्यावर नितांत प्रेम करणाऱ्या

माझ्या गुरू आणि माता असणाऱ्या

**सौ.जननीमाईस**

हे अभंग अर्पण !

## ***प्रस्तावना***

२०१७, २०१५,२०१४ या काळात मी हे अभंग लिहिले आहेत.

मी इयत्ता सातवीत असताना ध्यानयोगात प्रविष्ट झाले , त्याही पूर्वी मी त्राटक व दीपध्यान करत होते. तेव्हापासून मला ध्यान ,समाधि , ज्ञानयोग यांचा अनुभव आला होता, तो शब्दांत मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

ही सर्व जननीमाईंची कृपा आहे , की मी मला आलेले जटिल अनुभव शब्दांत मांडू शकले.

म्हणून मी हा अभंग संग्रह गुरुचरणी समर्पित करत आहे.

# शक्तिकवने

(कवयित्रीने वयाच्या ११ ते १४ वर्षे या काळात लिहीलेले अभंग)

# गुरुस्तवन

तुचि मम कल्पतरु| भवसागरे तूचि तारु| तव पारु| कवन जाणे||१||

तूचि योग्यता महान थोर| सर्वाहूनी श्रेष्ठ तुचि मम ईश्वर| खेळसी देवता- मनुष्य- असुर| हाती घेऊनी चेंडू फळी||२||

जनन ते प्राणहरण| मीलन ते गर्भधारण जीवनाचे समीकरण| तुचि चालवतसे||३||

अनन्येचा ‘अ’ आदिशक्तीचा आ'|
इंदुधारिणीचा तो  ‘ई’ ईश्वरीचा||४|

आदि अक्षरे तूचि गिरवलीस आकाशाच्या पाटीवरी| अनन्या, आदिशक्ती ,इंदुधारिणी व ईश्वरी| देवता देवी सारी| तुज पासूनच उदयेंली||५||

ऐसी ही, कुमारी शक्तिलीला अथवा कुमारी त्रिपुरसुंदरी देवता| एखादी महाविद्या| तुजपासूंनचि जन्मली व धन्य जाहली||६||

# ( अभंग ) दिसत नसे परि कोठे असे

आत्मा असे शरीराते|
नाही दिसत ते कोठे?||धृ||

शवविच्छेदी न दिसे कुठे काही|
शोधता शोध लागत नाही||१||

नसे का आत्मा शरीराते|
परि शरीर कैचे जगते||२||

चैतन्ये बाळविला देह|
चैतन्याहून श्रेष्ठ कोणी इह?||३|

चैतन्यचि असे आत्मा|

बोध होऊ दे त्या सत्वा||४||

अभेद्याछेद्यामृत आत्माचि तो| प्रकाशाचे

खेळ मांडियाला तो||५||

जाणताचि आत्मा|

बोध झाला ही परमात्मा||६||

जाणिता चैतन्यासी| होईल एकरुप

आत्मरुपासी||७||

मिसळताचि शर्करा जळी | दुमदुमली

हदयाची आळी||८||

रुप सत्याचे पाहता|

परमार्थाचे मार्गे चालता||९||

दर्शन परमात्माचे घडताचि|

ह्दय धन्य होत असे हे||१०||

जैसेचि हिम वितळता जळी| शक्तिलीला

म्हणे जीव परमात्मासी एकरुप होई||११||

# गुरुनमन

करिता तर स्तवन| मी झाले पावन|

तवकृपे ध्याने कुशीत घेउन गगन|

तु तोडील माझे जीवन मरण|

तु मोडील माझे कर्म बंधन|

तु करवशील मम्मुखे हरिभजन|

तू शिकवशील ओळखाया

अतर्क्य परब्रम्ह गगन|

तू शिकवशील ईश्वरचिंतन|

निं परकोटीचे ध्यान|

तू दाखवील मोक्ष पटकन|

तू देशील देहबुद्धी मरण|

तू लावशील मम आत्मसुखाशी लग्न|

मज मिळावे समाधान|

म्हणूनि आले तुज शरण

धरिते तवचरण||

# सद्गुरू नमन

सद्गुरू करोनि तव नामपुकार|

गाईल जिव्हा सोहमकार|

ध्यानात दिसशील तू निराकार|

तू निर्गुण परब्रह्म निरंहकार|

न तुज उकार-आकार|

तरीही माने ज्ञाते बीजाकार|

तू परमात्मा निरुपाधिक अपार|

तू निर्मळ निश्चय निर्विकार|

तू निरंजन निकळंक निरंतर|

तू निर्दोष निर्जात अव्यय अक्षय्यर|

तू नित्य अनंत विशाल अखंड
निर्विकल्पाकार|

तू निसंदेह निर्भेद निर्भेळ नभाकार|

तु नि मी काय भिन्न साकार|

आत्मी घुमेल तव कृपे सोहमकार|

तूच ब्रम्हज्ञान तूचि सार|

तव वर्तमानाच्या जिव्हे येई मर्यादा तत्कार|

तरीहि निससंदेह चित्ताने करितो नमस्कार||

# परब्रम्हाची प्रचीती

धन्य धन्य मी| गुरुमाय माझी मी होऊन
बैसले| तेचि परब्रम्ह साऱ्यांत भरलेले|
ध्याने मिटले प्रचक्षे देखिले| एकाकी||१||

शेजेशेजारी दिसली| सामोरीच्या सामोरींचे
हृदये हसली| श्वानहृदयही बैसली|
शत्रुशिक्षकांच्या नि शालेय सहपाठीच्या
देखील||२||

बाळकृष्णेही देखिली| पितृसवेही दिसली|
कलावतीते हृदयेही आरुढली|
सिद्धारुढहृदयेही सिद्ध जाहली| रामदास समर्थचे असु||३||

जयंतचे असु म्हणून| मजही गोळा करून|
माझा असु होऊन| पाळिले सर्व भूतांसी||४||

साऱ्यांत तू सामिले माय| तू नि मी भिन्न
काय| करी माया अलग जशी दुधाची साय|
केले अलिप्त||५||

महानांचे होऊनी कारण| चुकवूनि जीवांचे
जीवनमरण| सर्वांचे करी भरण पोषण|
आहेस तू सकलात्मा||६||

महानां--सामान्यांचा चुकवी जीवनमरणाचा फेरा| अहंकाराचा मोडूनि तोरा| स्वरुप तू सिद्धाचे||७||

पंचभूतांचे जी निर्वाण| तयांतही भरली उरुन| त्रयदेवांत परमात्मा होऊन| निराकार ब्रह्मस्वरूप||८||

सूर्यचंन्द्रातही असु जाहली| ध्याने मज देखली| हरेकदा तू असे निरूपम||९||

तू परमब्रम्हापरी निश्चळ| मायेगत चंचळ| परि सिध्दरुपे अचळ| खेळ करिसी सकळ||१०||

करूनि कर्तव्याचे नाटक| अज्ञान दाखवूनि
करी बंद उपाधीचे फाटक| किंतु अंतरी ज्ञान
स्फोटक| मुरलेले अवर्णित||११||

परब्रम्हास नामे तुज| न कर्म आवश्यकज|
नर्हि तव कृतिन| सिध्दे न कळे तव
करणी||१२||

विवेके ओरडे कानास ‘तू देह’ परमहंस|
तैसे लावे कर्तव्यास| म्हणे अलिप्त कर
मनास रत हो, निष्काम कर्मात||१३||

शक्ति म्हणे परब्रम्हासही नव्हे तव अर्हता|
थकेल ब्रम्हदेव गाता तव महता| तू
विश्वस्ता| माझी रहा होऊन||१४||

## मी जननीची लेक

मी जननीची लेक| तोडिले बंध अनेक|

परब्रम्ह व मी एक||धृ||

प्रपंचाचा मज भारी कंटाळा| बहात्तर पोंरा सोडिळा| तीन भावां तोडिळा| गुरुकृपे चौऱ्यांयशी डिकांनी थारा सोडिला देख| मी जननीची.......||१||

अष्टप्रकृतीचा चाळा| गुरुस खपेना
षडविकाराचा जिव्हाळा| द्वैताच्या कळा|
तोडिल्या मारूनि मेख| मी जननीची
.........||२||

दशदेहांचा किराणा| पंचतत्वाचा व्याज
भरणा| चारी खाण्यांच्या दश पवनांच्या
कर्जांना| दिले तिलांजलीचे दुःख| मी
जननीची..........||३||

छत्तिस रागिण्यांचा सूरमेळा| सोळा
मात्रांच्या खेळा| प्रवृत्तिच्या तळा| पलीकडे
दाविले सत्येक| मी जननीची........||४||

मायानदीत बुडू नये म्हणूनि| मला उचलेली
हाती| ध्यानाचा मंत्र सांगिला कानी|
घडविली चार बहिणींची भेट| मी जननीची
.......||५||

सप्त पाताळांच्या वर चढविले| चार

सोबतींस उडविले| मेरुवरी आकाश

मढविले| घातला छत्तिसांना धाक| मी

जननीची.....||६||

परब्रम्हास दिले मिसळून| सांगितले मोक्षाचे

साधन| चुकविले जन्ममरण|

शक्तिलीला म्हणे परमानंदाचा दिलास

शेक| मी जननीची लेक||७||

# मी जननीची वेडी

मी जननीची वेडी| सोडविते संसाराची
कोडी| पोचले ब्रम्हाच्या मांडी||धृ||

संसाराला सोडिले| बहात्तर पोरी सोडिले|
द्वैत नथमोती फोडिले| तीन पोरांना बाहेर
काढिले| पिण्यासाठी ब्रम्हज्ञानाची ताडी|
मी जननीची......| १||

चौप्यांयशी लांडगे पाठी लागले| सहा
लुच्चे लुटायला आले| छत्तिस कारवारीण
फसव्या माले| जनन्ये मोडिली तयांची
खोडी| भी जननी...||२||

दशदेहांचा बाजारे| आठजण फिरती| केस
मोकळोनि सारे| पाचजण आले घेवोनि
ऋणांचे वारे| फेडिली चवघींची साडी| मी
जननीची ....||३||

दहाजण म्हणाले| ने ही आमाले| परी चौघा मित्रांसी नेले| कोल्हाटीणीची झोप उडी| मी जननीची……||४||

बाजारात छत्तिस फिरकीवाल्या| सुर आळविता सोळा सूर हाता तोडांसी खेळविता| प्रवृत्ति तालावर नाचता| जनन्ये परी मन सात घरांकडे ओढी| मी जननीची ……||५||

सात घरांतून फिरवले| वरती मेरुबिंदूसी
अमृत पुरविले| अमृत दर्पिष्ट सरोवर
दाखविले| माळिणीचा फुलांचा हार
घालोनी बुडी मारण्यास झाले उघडी| मी
जननी.....||६||

मेरुवरी दिसले ते आकाश| अनंत कोटी
तयाचा प्रकाश| निराकार निर्विकार
निराभास निरास| करते याच्यासी
लाडीगोडी| मी जननीची............||७||

दिवसातून अनेकदा गुपचूप याच्यांशी मी भेटी| त्या ताराचंबळच्या काठी| जन्ममरणां चुकविण्यासाठी| शक्तिलीला म्हणे जननी तू उभारलीस परमानंदाची गुढी| तू केलीस तू मज भक्तीची वेडी| मी

जननीची............||८||

# देवा ! तू रे भक्तीचा दास|

देवा ! तू रे भक्तीचा दास|

उचल रे या भक्तांचा त्रास|

जगवावे दुर्गे होऊनि श्वास|

देवा तू रे भक्तीचा दास|

धरुनी तू मम निष्ठेची कास|

देवा तू रे भक्तीचा दास||धृ||

होऊनि बल्लवा कर स्वयंपाक|

होऊनि संरक्षिका घाल जनां धाक|

होऊनी, सत्रावी- तारा पाज अमृताचे घास|

देवा तू रे भक्तीचा दास||

होऊनि कुंडलिनी दाखव

सोहमकाराचा वास|

देवा तू रे भक्तीचा दास|

होऊनी मेरुआसनस्था दें पुष्प सुवास|

देवा तू रे भक्तीचा दास

केल्यास संसाराचा ऱ्हास

देवा तू रे भक्तीचा दास||१||

होऊनी चंडिका कर सहा लुच्चांना खलास|

देवा तूरे भक्तीचा दास|

होऊनी मेरु आसनस्था दे पुष्प सुवास|

देवा तू रे भक्तीचा दास॥

केलास संसाराचा ऱ्हास।

देवा तू रे भक्तीचा दास॥१॥

होऊनि चंडिका कर सहा लुच्चांना खलास।

देवा तू रे भक्तीचा दास॥

होऊनि कालिका ख़ा त्रिगुणांस।

देवा तू रे भक्तीचा दास॥

होऊनि कालवनिता थेंब न सांडवता

मात्र द्वैतबीजास।

देवा तू रे भक्तीचा दास।

चौऱ्यांयशी फेऱ्यांच्या लावलास फास।

देवा तू रे भक्तीचा दास॥२॥

होऊनि स्वरुपपूर्णा मिसळव परब्रम्हास।

देवा तू रे भक्तीचा दास॥

होऊनि रुद्रा कर देहबुद्धीचा नाश|

देवा तू रे भक्तीचा दास||

होऊनि परमानंद आत्मलीन बनव खास|

देवा तू रे भक्तीचा दास||

देहदृष्टीचा पडदा फाडून दाखविले आकाश|
देवा तू रे भक्तीचा दास||३||

शुद्ध सात्त्विक पक्षी आण भेटीस|

देवा तू रे भक्तीचा दास||

होऊन दाता दे ब्रम्हज्ञानाची रास|

देवा तू रे भक्तीचा दास||

ध्यानाची मंत्र फुंकुनी कानात|

मनी निर्म ध्यानीची आस|

देवा तू रे भक्तीचा दास||

जननी चंद्रमा नि शक्तीलीला चंद्रहास|

देवा तू रे भक्तीचा दास||४||

# सखये तू पावसावानी

सखये तू पावसावानी|

साऱ्या ऋतांची राणी|

परमार्थाची थेबां

मधून गाई गाणी|

चेंडूफळी तू खेळी कोल्हाटीणी|

सखये तू...||धृ||

आधी रिमझिम मग मुसळधार|

या पावसात नेई सुंदर नार|

धार मेरुतून धरेवरी थंड गार|

या पावसात भिजता आला शहार|

धून मल्हाराची फुंके तू कानी|

सखे तू ......||१||

एक सरोवर कमळांनी भरलेले|

पावसाचे जळ तयात काठोकाठ साठलेले|

काही हंस त्यात बसलेले|

कमळातली तू मुख्य हंसीणी|

देतेस गाठ साऱ्यांची घालूनी|

सखये तू .......||२||

विज मधेच चमकली|

चपले तू सावकाश चालली|

मधल्या नदीत पोहली|

तू मेरुवरी फुलवूनि|

शेवंती जुई गुलाब रातराणी|

सखये तू .....||३||

मेरुच्या टोकावर प्रवास करिता माळीण भेटली|

आत्मश्र्मा अलिंगना खेटली| पावसाळी मोती सारी तेथे दाटली| तू धाव चंबळेवाणी| भर धरेत रससानी| सखये तू ........||४||

गडद अंधार उजळले| तू धरेस भिजवले|

तू धरेस उजवले| हवे ते मिळवून दिले|

शक्तिलीला म्हणे अध्यात्मे तू वेडगळ

थोडी शहाणी| सखये, तू जननी|

सखये तू पावसावानी||५||

# जननीची स्तुति

माते तूं सद्गुणांची मूर्ती|

या शक्तीलीलाची कीर्ती|

सद्विचारांची स्फूर्ति|

सच्चिदानंदाची करी पूर्ति|

परीनं करेन तव स्तवन ||धृ||

तूं जशी ज्ञानाची गंगा|

संस्काराचा सागर.|

कधी न बुडू दिली|

भवसागरात आमुची घागर|

तूं बोलावे तसे तसे|

सुगंधित व्हावा तगर|

नेहमी पाय ओढणारी|

धरूनी तव पाय व्हावी|

शरणागत मगर|

वीजेच्या मधुर झंकारापेक्षा|

पवित्र स्वादिवाण तुझे गायन|

नारद-तुंबरूही करती नमन||१||

तूं हसावे तसे निर्झरांनी|

व्हावे जयवान|

नि:भावनिकांनीही व्हावे भावनावान|

तूं बनवतेस जेवण तैसे|

अन्नपूर्णा लाजती जैसे|

कधी खारट कधी अळणी|

एक निराळाच स्वाद त्रिभुवनासी|

श्रेष्ठ स्वाद उतरे मुखी|

तूं परमेश्वराचा पूर्णावातार|

करिसी तम व्यसनांचा परिहार|

सदा संसारविषये उदासीन|

सदा भक्तीत मन तव लीन||२||

तूझे गुण गावे केवढे गावे|

तया सीमा नाही|

नच तुज चरणाला उपमा नाही|

जिचे नेत्रे तेज ओतिले|

जिचे नेत्रेतून तेजपभ्रा होई मोकळे|

जिचे शरीर पूर्ण तेजःपुंज|

जिची चक्रे जणू चैतन्याचे विहारकुंज|

जिच्या पापण्या जसे किरण भानुचे|

जिच्या भिवया जसे रेखीव प्रत्यंचा दुर्गा

चापाचे|

जिचे ओष्ठ जसे गुलाबाचे दल|

जिच्या नेत्रांकडे प्रकाशांचा सतत कल|

जिचे कर सत्कर्मात गुंतती|

दुसऱ्यांसाठी कर्मफळे गुंफती|

जिचा मुक्तकंठ हरीभजन गाती|

जेत आध्यामिक ज्ञान स्फुरिसी|

जिची जिव्हा भाग्यवान|

जेत सरस्वती करे जिचे नामस्मरण|

जिच्या श्यामकमळचरणांवर वास करे

दासी लक्ष्मी जाण|

अष्टमहासिद्धी पाणी भरती जिच्या सदने|

जिचे मन पूर्ण निर्मळ|

नाही जेत वासनांच्या मळ|

जिचे चरणांतळी कामक्रोधमदमत्सरलोभ

होऊनी रजःकण|

पिपीलिका विव्हळत पायदळी|

जिचे एक करें माया ,दुसरे करें कुंडलिनी|

इंद्राणी रोहिणी आदि देवता|

दावी नम्रता

इंद्र ब्रम्ह देवता सामर्थशाली|

अंगठा पायाचा चोखे खाली|

जिचे भांगे युमना

जिची गुंफणे ब्रम्हपुत्रा|

जिची मान हिमालयांचा सुळका|

बर्फाच्छादित सुकळ|

जिच्या कंठे वासुषी|

चादर होई क्षीराब्धी शेषी|

जिच्या भाले वसे चंद्र|

मस्तकामागे छत्रदायक सूर्य||३||

# चक्रदर्शन

यौन मार्गे मूलाधारे नागीण मुखे
शेपोटी धरोनि वेटोळाली|
 ती झोपाळली| परी जनन्ये
तिची निद्रा वोडोवली|
साधन्ये मूलाधारास दंश करोन
पळाली| पळाली त्रिपुर सुंदरी
कुंडलिनी पळाली| पुढची यात्रा
कळाली||धृ||

मुलाधारे कुमारी षोडषी कुंडलिनी|

चार पाकळ्यांवरी मातंगी आकार

वेद धरोनि| ब्रम्हचारिणी कमंडूलातले

जल ओतोनि| योनी शुद्ध केली|

पळाली त्रिपुरसुंदरी ......||१||

स्वाधिष्ठाने गायत्री वीणा वाजवोनि|

ओंकार म्हणी| ब्रम्हदेव विचार स्फुरोवोनी|

नाभि शिव ध्यान लावोनी|

पार्वती रक्षण करोनि

देवता चक्राची कमळी|

पळाली त्रिपुरसुंदरी....||२||

हृदये अनुहते सोहम् मात्रा पुकारी|

शेषावरी पुरुष हरी| रक्षिका प्रकृती द्वारी|

त्रिभुवनस्वामीनी भुवनेश्वरी| देखिली|

पळाली त्रिपुरसुंदरी||3||

विशुद्ध सोळा पाकळ्यावरी| कंठ मकार

पुकारी| शैलपुत्री रक्षि मेरी| बगलामुखी

अमंगळ स्वर चीरी| अमृतचंबळी तारा

उतरली| पळाली त्रिपुरसुंदरी||४||

दोन भुवयांमध्ये उकार बोलिजे| सावित्री नेत्रे दृष्टी दिधीजे| धूमावती नेत्ररोग काढीजे| जाता जाता तेथे आज्ञा प्रकाशिली| पळाली त्रिपुरसुंदरी||५||

मणिपुरी सहा दलांवरी| कोल्हाटीण मूलाधारानंतर खेळ करी| तेथे भैरवी घोरतारा उग्रगौरी| तेथोनि स्वाधिष्ठानाकडे वळाली| पळाली त्रिपुरसुंदरी||६||

ब्रम्हरंधी मेरूवरी| तेजस मी नाही उरी|
सहस्त्र दळावरी ती माळीण तारांबळ घेवोनी
हातावरि|

ज्ञानशुक्र सत्रावीशेजारी| ओहम एकदाची
मिळाली| शक्तिलीला म्हणे यात्रा
सगळयांस कळाली| त्रिपुरसुंदरी
पळाली||७||

# चेंडूफळी (मालवणी)

तिका देखताच माज मन डोलल्यान

देखता देखता इसारला भान|

भान इसरे इसरे लागल्यान ध्यान|

ती इक उचसमाधी दैव्या जाण|

चढालय नसा, आडवा ह्या झाल्यान|

इक नळीबाय जोडला|

त्येत आत्मपारवा अडकला|

जाता जाता माय पुरा भायर गेलो|

पन जाता जाता बाय मांग फिरलो|

पण नळी परत जोडला|

लगी माझा हरी हुयेला|

धरलो बाय चेंडूफळी|

फळयाची बाय कासलो तळी|

तवा पक्षी वुडाला बाय सोडान नळी|

जणू बायल खेळान चेंडफळी|

उडवलो चेंडू बाय खळी|

नाशिकची वाटावं धरी|

मंग वुडावलो चेंडू पांडवावरी|

असं लय वुसार माझा हरी|

आत गेलो म्या लेणीवरी|

नारयपदी द्रौपदी लोटके धरान|

दारांक पाणी खाली पडान|

आत बाये हरी पांडवाक बोललो|

आत आत चार-पाच मानसं लेनीत

चाललो|

भिंतीवरला देवा द्रौपदी पाण्याक बसला|

नदीक खेळतो खेळतो कापड इसारला|

कुंती बाय नवलाई|

मातारी बायो चोळान चोळान|

चौंधन घसा घसा आक्रित ऐक बाई|

उलट फिरान परत गेला माथेरानवरी

बाये बाग देखता देखता टोलवलो

विटी-मुंबई ठेसनवरी|

दर्शन थोडेच व्हता गेलो जंजिऱ्यावरी|

किल्या देखिला बाये| लय कमाल

करत असा माजा मुकुंद पूनमधारी||

हा असं मोकळा सवंछंद धरी|

नेहमीच शक्तिलीलाक तारी||

घुमलय तिचे नावे ललकारी|

शक्तीलीला तिचे स्मरण करी|

जगतजननी ती स्वर्गधारी| पिये माजे डोळे

सदा तिचेच नाना कळा|

करुणेची वात्सल्याची थोडी

धार पडान तिचे नळा||

कोरधाची मूर्तिमंत ती दुर्गा जाण|

तिचे पाये माजा परणाम||

तेचेमूळेच मी सर्वांक अलीपत जाण|

शक्तीलीला करतल्यान नेमीच शक्तीची लीला

परमातम्याक आत्मा एकरूप बाये जाला||

# सूर्यमाला वरी यात्रा (झाडी बोली)

थोडेफार जांल लागल्यानं ध्यान|

हललान तो बाई जाण||

येका जागी यक नुरी बाई जोडल्यान|

तो हरुच हलल्यान अना पुढं गेलान||

चेनडू उडलान अवं नाशिकवरी|

यातरा झाल्यान पांडवलेनीवरी|

आत कागदावर अरजुनना महादेवापुडा

मस्तक ठेवल्यान ,

भिंतीवर दोरपदीच्या कमरंवरी हात

पारथ्यान सोबत ठेवन अशा नाचल्यानं ,

स्वर्गात त्याला इरह इरह झाल्यानं ,

वद्रा वद्रा डेमोकिरट्स शिल्प आसान ,

उरफ तया वद्रा दोरपदी ती

बाई जाण|

खेरुता खेरुता टोलल्यान चेनडू चरच

वरी|

म्येंच्छ बाया येंगले भायरी|

बागेत मंग फेरया घालल्यान ,

उडलान चेनडू पोचल्यान लंडन ,

पृथवीभायरी करताल्यान परदक्षिना ,

जिथे व्हती उष्णा ,

चंरदाचवफेर फेऱ्या घालल्यान ,

त्याची ककसा कलल्यान||

थंड थंड सांर चवफेर ,

दगड फुटता फुटता तयांनी

केलान घेर,

धूलकन हजारो मन ,

दिसल्यान पांढरकुरषणविवर||

*माझे अभंग वाचून कसे वाटले, हे सांगायचे असेल तर, मला*

*'shaktileelanikita@gmail.com'*

*या इमेल आयडी वर रिप्लाय द्या.*

# परिशिष्ट

१) पारू :- निर्माण

२) इंदुधारिणी:- मस्तकावर चंद्र धारण करणारी देवी.

३) अनन्या:- जी अन्यांप्रमाणे नाही, अशी.

४) इह:- पृथ्वी

५) बाळविला:- जन्म दिला

६) अभेद्यछेद्यामृत :- जो छेदला, भेदला जात नाही, असा आत्मा.

७) आळी:- अंगण.

८) अतर्क्य:- तर्क न करण्याजोगे.

९) सोहमकार:- सोहम् नाद.

१०) बीजाकार:- मूल बीज.

११) निरुपाधिक :- जो उपाधीच्या पलीकडे आहे, असा सद्गुरू.

१२) अव्यय:- ज्याचा कधीच नाश होत नाही.

१३) निर्जात:- जो कधीच जन्मला नव्हता,असा.

१४) अक्षय्यर:- ज्याचा कधीच क्षय होत नाही, असा.

१५) निर्विकल्पाकार:- जो स्वयं निर्विकल्प व निराकार आहे, असा.

१६) निर्भेळ:- जो स्वयंपूर्ण असून त्यात अशुध्दता नाही.

१७) तत्कार:- या क्षणी.

१८) असु:- प्राण.

१९) सकलात्मा:- सर्वांच्यात वास करणारा, परमात्मा.

२०) विश्वस्ता:- विश्वासू.

२१) बहात्तर पोरां:-७२ लाख नाड्या.

२२) तीन भावां :- तीन गुण.

२३) चौऱ्यांऐंशी डिंकांनी:- ८४ लक्ष योनी, ज्या मुमुक्षूता नसल्याकारणे मनुष्याला चिकटून असतात.

२४) द्वेताच्या कळा:- परमात्मा व आत्मा भिन्न आहेत अशी विचारधारा.

२५) मेख:- गाठ, अडथळा आणणे

२६) चार खाणी:- चार अवस्था, निद्रा, जागृती, स्वप्न, तुर्या.

२७) दश देह :- मनुष्य, देवता(दिव्य), राक्षस, गंधर्व, जीवजंतू, पशु,पक्षी, पिशाच्च, यक्ष,व ब्रम्हराक्षस असे दहा प्रकारचे देह.

२८) अष्टप्रकृती :- आठ प्रकारच्या प्रवृत्ती.

२९) षडविकार :- काम,क्रोध,मद,मत्सर,लोभ,द्वेष.

३०) पंचतत्व :- तेज, अग्नी, पृथ्वी,आकाश,आप ही शरीरातील तत्वं.

३१) छत्तिस रागिणी :- छत्तिस गुण-अवगुण.

३२) सोळा मात्रा :- प्रवृत्तीच्या १६ मात्रा.

३३) चार बहिणी :- चार अवस्था.

३४) सप्त पाताळ :- सात चक्रे.

३५) मेरुवरी :- ब्रम्हरंधावर.

३६) ऋण :- कर्ज.

३७) कोल्हाटीण :- कुंडलिनी.

३८) मेरु बिंदू :- श्वेत बिंदू.

३९) निरास :- ज्याला कुठल्याही प्रकारचा आस (आकार) नाही किंवा जो कुठल्याही प्रकारच्या इच्छेपासून अलिप्त आहे.

४०) व्यसन :- संकट.

४१) परिहार :- निवारण.

४२) भानु :- सूर्य आणि सूर्याचा किरण.

४३) क्षीराब्धी :- क्षीरसागर.

४४) ताराचंबळ :- तारेने दिलेले अमृत रस.

४५) कालवनिता :- काली.

४६) स्वरुपपूर्णा :- परब्रम्ह स्वरुप.

४७) आत्मलीन :- आत्म्यामध्ये विलीन करणे.

४८) सात्विक पक्षी :- आत्मा.

४९) चपला :- वीज.

५०) यौन मार्गे :- योनीच्या मार्गाने.

५१) वोडोवली :- उडवली.

५२) कमळी :- लक्ष्मी देवी, कमला.

५३) सत्रावी :- ब्रम्हरंधात असणारी १७ वी पुरुष प्रकृती.

५४) ज्ञान शुक्र :- तेजस किंवा षोडस रक्तपित्री.

५५) वुडाला :- उडाला.

५६) वुसार :-हुशार

५७) अलीपत :- अलिप्त


५८) हरुच :- हळूच

५९) वद्रा :- वर

६०) खेरुता :- खेळता.

## निकिता पाटील यांचे ई साहित्यवरचे पहिले पुस्तक




पुस्तक वाचण्यासाठी कव्हरवर क्लिक करा

**ई साहित्य प्रतिष्ठानला तेरा वर्षं पूर्ण झाली.**
**निकिता पाटील यांचं ई साहित्यचं हे तिसरं पुस्तक.**

निकिता राजेश पाटील ही मूळची डोंबिवलीची असून सद्यकालात तिचे वास्तव्य काही वर्षांपासून वांगणीत आहे. कुटुंबात लेखनाचा वा साहित्याचा वारसा असा नाही. पण अगदी शालेय वयातच तिला लेखनाची ऊर्मी शांत बसू देईना. वयाच्या तेराव्या वर्षापर्यंत तिने पूर्ण पुस्तक होईल इतके लिहिले. नंतर मराठी साहित्याचा रितसर अभ्यास करून आता ती साहित्याच्या वेगवेगळया रसांच्या निर्मितीचा अनुभव घेत आहे. तिने लिहिलेल्या पहिल्या दोन्ही पुस्तकांचे कौतुक वाचकांनी केले आहे. सध्या ती आपल्या चौथ्या व पाचव्या पुस्तकाच्या तयारीत आहे.

असे अनेक तरूण लेखक खूप छान लिहीत आहेत. पण त्यांची पुस्तकं प्रकाशित करायला प्रकाशक धजावत नाहीत. कारण त्यांचे नाव प्रसिद्ध नसल्यामुळे त्यांच्या पुस्तकविक्रीबद्दल प्रकाशक साशंक असतात. जर या लेखकांची पुस्तके वाचकांसमोर आली नाही तर त्यांचे नांव प्रसिद्ध होणार कसे? या दुष्टचक्रात सापडून अनेक तरूण लेखकांच्या पिढ्या बरबाद झाल्या. पण आता इंटरनेटवर नवलेखकांना वाचकांपर्यंत नेण्याचे काम अनेक संस्था करत आहेत.

ई साहित्य प्रतिष्ठान त्यातील एक. ६ लाख वाचकांपर्यंत या नवीन लेखकांना नेण्याचे काम ही संस्था करते. पूर्ण विनामूल्य. लेखकांनाही

कोणताही खर्च नाही. भविष्य काळात लेखकांना भरघोस मानधन देण्यासाठी ई साहित्यचे प्रयत्न चालू आहेत. नवनवीन ताकदवान लेखक ई साहित्याकडे वळत आहेत. त्यांना प्रतिसादही मिळतो. कुणाला भरघोस स्तुती तर काहींच्या वाट्याला टीकाही येते. या टीकेला positively घेऊन हे लेखक आपला कस वाढवत नेतात. सुरूची नाईक, प्रफ़ुल शेजव, भाग्यश्री पाटील, कोमल मानकर, सुरज गाताडे, अनूप साळगावकर, बाळासाहेब शिंपी, चंदन विचारे, सौरभ वागळे, यशराज पारखी, चंद्रशेखर सावंत, संयम बागायतकर, ओंकार झांजे, पंकज घारे, विनायक पोतदार, चंद्रकांत शिंदे, निरंजन कुलकर्णी, चारुलता विसपुते, कार्तिक हजारे, गणेश सानप, मनोज चापके, महेश जाधव, मनोज गिरसे, मृदुला पाटील, निलेश देसाई, सनहा पठाण, संजय बनसोडे, संजय येरणे, शंतनू पाठक, श्रेणिक सरडे, शुभम रोकडे, सुधाकर तळवडेकर, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा, विनिता देशपांडे, सौरभ कोरगांवकर, मिलिंद कुलकर्णी, शुभम पाटील, आशिष कर्ले, सुरेंद्र पाथरकर, प्रीती सावंत दळवी, निमिष सोनार, उमा कोल्हे, गणेश ढोले, सचिन तोडकर, महेश पाठाडे, अभिजीत पैठणपगारे, कार्तिक हजारे, किरण दशमुखे, जगदिश खांदेवाले, माधुरी नाईक, विशाल दळवी, गौरी कुलकर्णी, जितेश उबाळे, प्रितम साळुंखे, कुमार सोनावणे, प्रतिक उकले, सुजाता सिद्धा, गायत्री रोडे, मनोज कळमकर, काजल दळवी, सचिन बोरसे, कार्तिकी भट, डॉ. प्रितम दरवडे, अमोल गवळी, निकिता पाटील,

संजीवनी देशपांडे, अंकिता शिंदे, काजल दळवी असे अनेक तरूण लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत.

इंटरनेटवर हौशी मराठी लेखकांची कमी कधीच नव्हती. आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनाला पैलू पाडण्याकडे लक्ष देणारे तरूण लेखक येत आहेत. ही नवीन लेखकांची फ़ौज मराठी भाषेला नवीन प्रकाशमान जगात स्थान मिळवून देतील. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

या सर्वात ई साहित्याचाही खारीचा वाटा असेल हा आनंद.

या यशात ई लेखकांचा सिंहाचा वाटा असेल याचा अभिमान.

बस्स. अजून काय पाहिजे?